नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162


# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २३४ Issue - 234 | वार शुक्रवार दि. १० जानेवारी २०२५ Blow- Friday Date 10 January 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात...



### राज्य मंडळाकडून बारावीच्या परीक्षेचे प्रवेशपत्र उपलब्ध

पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) फेब्रुवारी-मार्चमध्ये घेतल्या जाणाऱ्या बारावीच्या परीक्षेचे प्रवेशपत्र शुक्रवारपासून (१० जानेवारी) ऑनलाइन उपलब्ध होणार आहे. शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रवेशपत्र मुद्रित करून विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, त्यासाठी कोणतेही वेगळे शुल्क आकारू नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

राज्य मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. राज्य मंडळातर्फे बारावीची लेखी परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत होणार आहे. दरवर्षीच्या तुलनेत यंदा काही दिवस लवकर परीक्षा होणार आहे. कुलाळ यांनी दिलेल्या माहितीनुसार, बारावीच्या परीक्षेचे प्रवेशपत्र राज्य मंडळाच्या हींींि://ु.ारहरहीललरीव.ळप या संकेतस्थळावर ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. प्रवेशपत्रा-वरील छायाचित्र सदोष असल्यास त्यावर विद्यार्थ्याचे छायाचित्र चिकटवून त्यावर संबंधित मुख्याध्यापक किंवा प्राचार्य यांनी शिक्का मारून स्वाक्षरी करावी. प्रवेशपत्र विद्यार्थ्याकडून गहाळ झाल्यास संबंधित उच्च माध्यमिक शाळा किंवा कनिष्ठ महाविद्यालयाने पुन्हा प्रवेशपत्राची मुद्रित प्रत घेऊन त्यावर लाल शाईने द्वितीय प्रत असे नमूद करून विद्यार्थ्यांना द्यायचे आहे. प्रवेशपत्रामध्ये नाव, आईचे नाव, जन्मतारीख अशा दुरुस्त्या करायच्या असल्यास त्या ऑनलाइन पद्धतीने करायच्या आहेत. त्यासाठी दुरुस्ती शुल्क भरून दुरुस्त्या विभागीय मंडळाकडे मान्यतेसाठी सादर कराव्यात. विभागीय मंडळाच्या मान्यतेनंतर सुधारित प्रवेशपत्र उपलब्ध होणार आहेत. विषय, माध्यम बदल असल्यास प्रचलित पद्धतीनुसार विभागीय मंडळात संपर्क साधून दुरुस्त्या कराव्यात.

# भविष्य हे युद्धाचे नसून, बुद्धांचे!

## प्रवासी भारतीय दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन



**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

पीटीआय, भुवनेश्वर : 'भविष्य हे युद्धाचे नसून, बुद्धांचे आहे,' असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी केले. 'भारताला लाभलेल्या उत्तम अशा वारशामुळे आज आपण हे सांगू शकतो आहोत,' असेही ते म्हणा-ले. भुवनेश्वर येथे १८ व्या प्रवासी भारतीय दिवस संमेलनात त्यांनी उपस्थितांना संबोधित केले. प्रवा-सी भारतीय ज्या देशात राहतात, तेथे ते भारताचे राजदूतच असतात, अशा शब्दांत मोदी यांनी प्रवासी भारतीयांचे कौतुक केले.

'लोकशाही व्यवस्थेचे मातृत्व म्हणजे केवळ भारत नाही, तर येथील नागरिकांच्या जीवनमानाचाच तो एक भाग आहे,' असे मोदी म्हणाले. जगात आज भारताचा आवाज ऐकला जात असून, केवळ भारत स्वत:ची मते आंतरराष्ट्रीय स्तरावर मांडू शकत नाही, तर पूर्ण विकसनशील देशांचाही (ग्लोबल साउथ) आवाज बनला आहे, असे ते म्हणाले.

प्रवासी भारतीयांसमोर बोलताना मोदी म्हणाले, 'साम्राज्यांचा विस्तार जेव्हा तलवारीच्या बळावर होत होता, त्या वेळी सम्राट अशोकाने शांततेचा मार्ग स्वीकारला. भारताच्या वारशाची ही शक्ती आहे. अशा वारशामुळे भारत आज जगाला सांगू शकतो, की भविष्य हे युद्धात नसून, बुद्धामध्ये आहे.

'आम्हाला विविधता शिकवावी लागत नाही. त्यामुळे जगात जिथे कुठे भारतीय जा-तात, तेथील समाजाचा ते एक भाग होऊन जातात. संबंधित देशाच्या प्रथा, परंपरांचा आम्ही आदर करतो आणि संबंधित देशाची प्रामाणिकपणे सेवा करतो. त्या देशाच्या वाढीसाठी, समृद्धीसाठी योगदान देतात. याच वेळी भारतासाठी आपल्या हृदयाचे ठोकेही वाजत राहतात. अशा प्रवाशांमुळेच मी सगळीकडे मान ताठ ठेवून जाऊ शकतो. जगभरातून मला मिळणारे प्रेम मी विसरू शकत नाही. गेल्या १० वर्षांत जगभरातील अनेक नेत्यांना भेटलो. सर्वांनी भारतीय समुदायाचे कौतुक केले. संबंधित देशात जी सामाजिक मूल्ये तुम्ही घेऊन जाता, त्यामुळे हे कौतुक होते. मी सर्वांचे आभार मानतो,' असे मोदी म्हणाले.

# केसगळतीचा फैलाव ११ गावांत; रुग्णसंख्या शंभरी पार, दिवसभरात पाच गावे वाढली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा : अवघ्या तीन-चार दिवसांत अचानक केसगळतीला सुरुवात होऊन टक्कल पडण्याचा संसर्ग गुरुवारी अकरा गावांपर्यंत पसरला. पाच गावांची नव्याने भर पडल्याने या संगर्साचे रुग्ण आता शंभरावर पोहचले आहेत.

दिवसागणिक रुग्णसंख्या वाढू लागल्याने आरोग्य यंत्रणा हादरली आहे. ही सर्व गावे खारपाणपट्ट्यातील असल्याने या गावांमध्ये 'नायट्रेट', 'डीटीएस'चे प्रमाण अधिक आहे. पाण्यामुळे हे घडत असल्याचाही धोका व्यक्त झाल्याने पाण्याचे नमुने 'हेवी मेटल्स'च्या तपासणीसाठी नागपूरला पाठविण्यात आले आ-हेत. पाच रुग्णांच्या नमुन्यांची 'स्कीन बायोप्सी'ही केली जाणार आहे. या दोन्हींचे अहवाल आठ-दहा दिवसांनी येणार असल्याने केसगळतीच्या निदानासाठी आणखी काही दिवस गावकऱ्यांना प्रतीक्षा करावी लागणार आहे.



शेगाव तालुक्यातील बोंडगाव, कालवड, कठोरा, भोनगाव, हिंगणा, घुई या सहा गावांमध्ये आठ वर्षांच्या लहान मुला-मुलीं-पासून महिला व पुरुष अशा ५२ जणांना केसगळतीची समस्या असल्याचे दिसले. ७० ते ८० टक्के केस आपसूकच गळाल्याने लोकांनी टक्कल केले. आरोग्य यंत्रणेचे ५० अधिकारी, डॉक्टर व कर्मचारी केसगळती झालेल्या गावांमध्ये ७ जानेवारी रोजी पोह-ोचले. त्वचा रोगतज्ज्ञ डॉ. बालाजी आदरट यांनी रुग्णांची तपासणी करून 'फंगल इन्फेक्शन'चा प्राथमिक अंदाज वर्तविला. आरोग्य पथकांकडून घर-ोघरी जाऊन सर्वेक्षण केले जात आहे. हे सारे घडत असतानाच गुरुवारी तरोडा कसबा, पहुरजिरा, निंबी, माटरगाव व मच्छिंद्रखेड या गावांमध्येही केसगळतीचे रुग्ण आढळले. या गावांतही आरोग्य विभागाने नमुने घेऊन तपासणीसाठी पाठविले आहेत. सुमारे ७० ते ८० टक्के केसगळती झाल्यानंतर लोक टक्कल करून घेत आहेत. हे केल्यानंतर त्यांच्या डोक्यात परत केस उगवत असल्याची माहिती सरपंच रामा थारकर यांनी दिली. 'नायट्रेट', 'टीडीएस'चे मोठे प्रमाण आढळून आले. पाणी पिण्यास आणि वापरण्यास अयोग्य असल्याचा अहवाल प्राप्त झाला आहे. मात्र आम्ही पिढ्यान्पिढ्या हेच पाणी पित आलो आहे. किडनी रोग वगळता आजपर्यंत आम्हाला कोणतीही समस्या उद्भवली नाही, असे खातखेड-बोंडगावचे सरपंच रामा थारकर यांनी सांगितले. महिलांसाठी केस हे त्यांच्या सौंदर्याचा एक भाग आहे. या महिलांचेही केस गळू लागल्याने त्यांच्यात भीती वाढली आहे. अनेक महिला धास्तीपोटी समोरही येत नसल्याचे दिसून येत आहे. या महिलांवर उपचारासाठी समुपदेशन करण्याची गरज आहे. ग्रामपंचायतींमार्फत या महिलाचे समुपदेशन केले जात आहे.

# गतीशिलता आणि पारदर्शका या दोन्हीचा समावेश आमच्या प्रशासनात : फडणवीस



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : देवेंद्र फडणवीस म्हणाले, आम्ही गतीशिलता आणि पारदर्शी कारभार या दोन्हीचा समावेश आमच्या प्रशासनात आहे. राज्यकर्त्यांनी प्रशासन योग्य पद्धतीने चालवायचं असतं. मागच्या दहा वर्षांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दिल्लीचं प्रशासन बदलून टाकलं. दिल्लीचं राजकारण म्हणजे ठगांचं राजकारण, दलालांचं राजकारण आहे असं म्हणायचे. आता तिथे ठगही सापडत नाहीत आणि दलालही सापडत नाहीत असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ऋख च्या बाबतीत आपण पहिल्या क्रमांकावर आहोत. साधारण १० ते १५ वर्षांपूर्वी चेण करण्याची पद्धत होती. आता मात्र ती परिस्थिती मुळीच नाही. खरोखर चेण केले जातात असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे तिसऱ्यांदा राज्याचे मुख्यमंत्री झाले आहेत. पहिल्यांदा २०१४ मध्ये ते राज्याचे मुख्यमंत्री झाले होते. त्यानंतर २०१९ ला ७२ तासांसाठी ते मुख्यमंत्री झाले. त्यानंतर २०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला प्रचंड बहुमत मिळालं तसंच एकट्या भाजपाला १३२ जागा मिळाल्या. यानंतर देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले आहेत. पहिल्यांदा मुख्यमंत्री झाल्याच्या घटनेला दहा वर्षे पूर्ण झाली. आता मुख्यमंत्री झाल्यानंतर काय वाटतं? याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाष्य केलं आहे. तसंच व्यक्ती म्हणून आणि राजकीयदृष्ट्या मी अनेक आव्हानांचा सामना केला आहे आणि त्यातून प्रगल्भता आली आहे असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

मागच्या दहा वर्षांमध्ये पुलाखा-लून बरंच पाणी वाहून गेलंय म्हण-तात तसं झालं आहे. मला आ-लेले अनुभव असेच आहेत. दहा वर्षांपूर्वी लोक संशयाने बघायचे की हा व्यक्ती कधी मंत्रिपदावरही आला नाही आणि मुख्यमंत्री झाला तर हा काही करु शकेल का? पाच वर्षांच्या पूर्ण कार्याकाळानंतर मी आता पुन्हा मुख्यमंत्री झालो तेव्हा लोकांनी मी काय करु शकतो किंवा माझी क्षमता काय ते बघितलं, अनुभवलं असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

एक व्यक्ती म्हणूनही अनेक आव्हानांचा सामना केला आहे की त्यातून आता परिपक्वता आली आहे. आता मला आव्हानांची चिंता वाटत नाही किंवा मल्टिटास्किंग म्हण-तो तशी आव्हानं पेलत असताना, आपला अजेंडा ढळू द्यायचा नाही. आपल्या अजेंड्यावर आपण चालत राहायचं असा माझा प्रयत्न असणार आहे. मागच्या दहा वर्षांत २०१९ हे वर्ष आलं नसतं तर महाराष्ट्र वेगाने पुढे गेला असता. २०१९ ते २०२४ या कालावधीत महाराष्ट्रात काय काय घडलं हे मी वेगळं सांगायची आवश्यकता नाही.

# पक्ष वगैरे न बघता दोषी आढळणाऱ्यावर कडक कारवाई करणार : अजित पवार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : बीडच्या मस्साजोग-चे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर राज्यातील राजकीय वातावरण ढवळून निघत आ-हेत. अशात अनेक राजकीय नेत्यांसह समाजिक कार्यकर्त्यांनी या हत्येतील आरोपींचा धनंजय मुंडे यांच्याशी कथित संबंध असल्याचा आरोप करत, मुंडे यांच्या कॅबिनेट मंत्रिपदाच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

पुण्यात आज उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी मुंडे यांच्या राजीनाम्याबाबत विचारले असता ते म्हणा-ले, पक्ष वगैरे न बघता दोषी आढळणाऱ्यावर कडक कारवाई करणार आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार आज पुणे दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. पत्रकारांनी त्यांना मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याविषयी विचारले. यावर अजित पवार म्हणाले, या हत्या प्रकरणाचा विविध तपास यंत्रणा तपास करत आहेत. त्याच्यबरोबर मुख्यमंत्र्यांनीही सांगितले आहे, या प्रकरणात कोणी दोषी असल्याचे सिद्ध झाले तर त्याच्यावर ताबडतोब कारवाई केली जाईल. मी सुद्धा देवेंद्र फडणवीस यांना भेटून सांगितले आहे की, पक्ष वगैरे न बघता यामध्ये वरिष्ठ पातळीवर काम करणारे कोणी दोषी असतील तर त्यांची गय करण्याचे कारण नाही. ही निर्घून पद्धतीने झालेली हत्या आहे. अशा प्रकारच्या घटना आम्ही खपवून घेणार नाही. बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येवरून विरोधी पक्ष आणि विविध सामाजिक संघटनांनी आंदोलनं सुरू केली आहेत. या हत्याप्रकरणामुळे धनंजय मुंडे वादाच्या केंद्रस्थानी सापडले असून त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. धनंजय मुंडे यांचे कथित निकटवर्तीय वाल्मिक कराड यानेच देशमुख यांच्या हत्येचा कट रचला होता, असा आरोप केला जात आहे.

बीड जिल्ह्यातील मस्साज-ोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर रोजी हत्या करण्यात आली होती. या हत्येला एक महिना होऊनही अद्याप सर्व आरोपींना अटक झालेली नाही. गेल्या आठवड्यात मुख्य आरोपी सुदर्शन घुलेसह सु-धीर सांगळेला अटक करण्यात आली होती. सुदर्शन घुले, कृष्णा आंधळे आणि सुधीर सांगळे हे हत्या झाल्यानंतर फरार झाले होते. त्यांना पकडण्यासाठी सीआयडीने प्रसिद्धीपत्रक जारी करत त्यांना फरार घोषित केले होते. त्यानंतर ४ जानेवारीला या दोघांना अटक झाली होती. तर तिसरा आरोपी कृष्णा आंधळे अद्याप फरार आहे.

**संपूर्ण उपचार मोफत करण्यासाठी धोरण तयार** | **आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा आढावा**

# 'महात्मा फुले जन आरोग्य योजने'तील रुग्णालयांची स्वतंत्र पथकामार्फत चौकशी!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : दुर्धर आजारांवरील उपचार व शस्त्रक्रीया या महागड्या उपचारांमध्ये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना गरीबांना संजीवनी आहे. या योजना अंतर्गत च्या रुग्णालयांच्या कामाची व गुणवत्तेची चौकशी स्वंतत्र पथक नेमून करण्यात येणार असून याबाबतचे निर्देश आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले आहेत. त्याचप्रमाणे अवयव प्रत्यारोपणसारख्या महागड्या शस्त्रक्रिया व उपचारांकरीता महात्मा फुले जनआरोग्य योजना आणि आरोग्य विभागाच्या अन्य योजनांची सांगड घा-लून संपूर्ण उपचार मोफत करण्यासाठी धोरण तयार करण्यासही मंत्री आबिटकर यांनी सांगितले.

आरोग्य भवन येथे आयोजित बैठकीत महात्मा फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा आढावा सार्वजनिक आरोग्य मंत्री आबिटकर यांनी घेतला. या बैठकीला आरोग्य सेवा आयुक्त अमगोथू रंगा नायक, संचालक डॉ नितीन अंबाडेकर, राज्य हमी विमा सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण, उप मुख्य कार्यकारी अधिकारी बोंदरे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.




रस्ते अपघातामध्ये जखमींना नजीक व उपलब्ध असणाऱ्या कुठल्याही रूग्णालयात उपचार घेतलेल्या रूग्णांना योजनेचा लाभ देण्यासाठी धोरण तयार करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले . तसेच योजनेच्या पोर्टलवर प्राप्त व प्रलंबित असलेल्या सुमारे १०७५ तक्रारीबाबत तातडीने नोटीसेस देवून खुलासा घेण्यात यावा. तसेच आवश्यकतेप्रमाणे कठोर कारवाईची प्रक्रिया किमान २ आठवड्यात पूर्ण करावी. याबाबत अंमलबजावणी सहाय्य संस्थेकडून प्राप्त तक्रारीवर तातडीने कार्यवाही होत नसल्यास व कारवाईचे प्रस्ताव समितीसमोर सादर केले जात नसल्यास आढावा घेवून अशा संस्थांवर कारवाई करावी. तक्रार निवारणाबाबत नव्याने प्रमाणीत कार्यपद्धती तयार करून कठोर कारवाईच्या तरतूदी कराव्यात असेही निश्चित करण्यात आले.

या योजने अंतर्गत रूग्णालयांच्या कामकाजाची गुणवत्ता तपासणी व मुल्यमापन करण्यासाठी राज्य आरोग्य हमी सोसायटी मुख्यालयाकडून स्वतंत्र पथक स्थापन करावे. महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना आणि आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना यांच्या अंमलबजावणीवर सनियंत्रण व देखरेख ठेवण्यासाठी जिल्ह्या-तील विधीमंडळ सदस्यांचा समावेश असलेली संबंधित जिल्ह्या-तील पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याची सूचना त्यांनी केली.

आयुष्मान कार्डच्या १०० टक्के वितरणाकरिता तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरण, राष्ट्रीय सुचना व विज्ञान केंद्र, अन्न व नागरी पुरवठा विभागाची आरोग्य विभागासोबत संयुक्त बैठकीचे आयोजन करण्यात यावे. सध्या योज-नेनुसार १३५६ उपचार पद्धती आहे. या पद्धतींचा आढावा घेवून त्यामध्ये राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाच्या उपचार पद्धतीपैकी आवश्यक उपचारांचा समावेश करणे, सध्याच्या उपचार पद्धतीत बदल किंवा सुधारणा करणे, नवीन उपचार पद्धतींचा समावेश, शासकीय रूग्णालयांच्या राखीव प्रक्रियापैकी काही उपचार आवश्यकतेप्रमाणे खा-जगी रूग्णालयासाठी उपलब्ध करून देण्याबाबत तज्ज्ञांशी चर्चा करून प्रस्ताव तयार करण्यात यावे, असे निर्देशही यावेळी आरोग्यमंत्र्यांनी दिले. आरोग्य विभागातील सर्व योजनांच्या प्रचार व प्रसिद्धीकरीता जिल्हास्तरावर स्वतंत्र संपर्क यंत्रणा तयार करण्यात यावी. धर्मादाय रूग्णालये आणि शासकीय जमीन नाममात्र अथवा सवलतीच्या दराने दिलेल्या नामांकित रूग्णालयांना योज-नेत समाविष्ट करून घेण्याकरीता प्रवृत्त करण्यासही त्यांनी सांगितले.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
शुक्रवार दि. १० जानेवारी २०२५


## संपादकीय....

### मोफत उपचार

रस्ते अपघातात जखमी झालेल्या मृतांसाठी केंद्र सरकारकडून मोठी घोषणा करण्यात आली आहे. रस्ते अपघातात जखमी झालेल्यांना 'कॅशलेस' उपचाराची सुविधा मिळणार आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी ही 'कॅशलेस' उपचार योजना जाहीर केली. कॅशलेस उपचारांतर्गत रस्ते अपघातग्रस्तांना 'कॅशलेस' उपचार देण्यात येणार आहेत. प्रत्येक अपघातासाठी प्रति व्यक्ती कमाल १.५ लाख रुपये रोखरहित उपचार सुविधा उपलब्ध असेल. उपचाराचा खर्च केंद्र सरकार उचलणार आहे. ही 'कॅशलेस' उपचार योजना मार्चमध्ये सुरू होत असल्याचे केंद्रीय मंत्री म्हणाले. त्याअंतर्गत भारतभरातील रस्ते अपघातग्रस्तांना 'कॅशलेस' उपचार घेण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाईल. या योजनेंतर्गत रस्ते अपघा-तात बळी पडलेल्या व्यक्तीच्या सात दिवसांच्या उपचारावर जास्तीत जास्त दीड लाख रुपयांचा खर्च सरकार उचलणार आहे. अपघातानंतर २४ तासांच्या आत पोलिसांना माहिती दिल्यास पीडितेच्या उपचाराचा खर्च केंद्र सरकार उचलेल. यासोबतच सरकारने हिट अँड रन प्रकरणातील पीडितांच्या कुटुंबीयांना २ लाख रुपयांची भरपाई जाहीर केली आहे. तसेच ही कॅशलेस उपचार योजना रस्त्यावरील वाहनांच्या कोणत्याही श्रेणीमुळे होणाऱ्या अपघातांसाठी लागू असेल. ही योजना राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरण (छक), रुग्णालये, पोलीस आणि आरोग्य संस्था यांच्या समन्वयाने अंमलबजावणी करणाऱ्या एजन्सीद्वारे चालविली जाईल. १४ मार्च २०२४ रोजी पायलट प्रोजेक्ट अंतर्गत, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने ही योजना प्रथम चंदीगड आणि नंतर सहा राज्यांमध्ये विस्तारित केली होती. रस्ते अपघातात बळी पडलेल्यांना वेळेवर उपचाराची सुविधा मिळावी यासाठी सुरू करण्यात आलेली ही योजना आता मार्च महिन्यात संपूर्ण भारतात लागू होणार आहे. भारतात सध्या २२ लाख चालकांची कमतरता आहे, असा खुलासा नितीन गडकरी यांनी केला. गडकरींनी जयपूरमध्ये झालेल्या अपघाताचे उदाहरण दिले, ज्यामध्ये चालक पहाटे साडेचार ते रात्री साडेनऊ वाजेपर्यंत गाडी चालवत राहिला. जे युरोपमध्ये ठरवलेल्या आठ तासांच्या ड्रायव्हिंग मर्यादेपेक्षा खूप जास्त आहे. याला सामोरे जाण्यासाठी, मंत्रालय नवीन उपायांवर विचार करत आहे, जसे की वाहनाचे इंजिन सुरू करण्यासाठी आधार-लिंक केलेले कार्ड स्वाइप करणे, त्याद्वारे ड्रायव्हिंगच्या तासांचे नियमन करणे आणि चालकांना पुरेसा वेळ मिळेल याची खात्री करणे. गडकरींनी धक्कादायक आकडेवारी मांडली, की २०२४ मध्ये १.८० लाख मृत्यूंपैकी ३५,००० मृत्यू हे वैध परवान्याशिवाय वाहन चालवणाऱ्या चालकांमुळे झाले. या रस्ते अपघातांमध्ये वाढ होत असताना मंत्रालयाने परवाना नसताना वाहन चालवण्याच्या समस्येला तोंड देण्यासाठी चालक प्रशिक्षण धोरण सुरू केले आहे.

# नीरा भीमा कारखान्याचा ऊस बिलाचा रू. २८०० प्रमाणे हप्ता जाहीर : लालासाहेब पवार

## शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये शुक्रवारी वर्ग केला जाईल असल्याची दिली माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे

दि. ९/१/२०२५ शहाजीनगर येथील निरा भिमा सहकारी साखर कारखान्याने चालु सन २०२४-२५ च्या उस गळीत हंगामासाठी ऊस बिलाचा हप्ता प्रति टन रु. २८०० प्रमाणे जाहीर केला असून, शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये शुक्रवारी (दि.१०) वर्ग केला जाईल, अशी माहिती कारखान्याचे अध्यक्ष लालासाहेब पवार यांनी गुरुवारी (दि.९) दिली.

कारखान्याचे संस्थापक व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांचे मार्गदर्शनाखाली कारखान्याने चालु गळीत हंगामामध्ये आज अखेर १.५ लाख मे. टन ऊस गाळप पुर्ण केले आहे. या गळीत हंगामामध्ये दि.१५ डिसेंबर अखेर गाळप झालेल्या ऊस बिलाची रक्कम उद्या शुक्रवारी उस उत्पादक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाईल, अशी माहितीही लालासाहेब पवार यांनी दिली.

निरा भिमा कारखान्याकडून चालु हंगामामध्ये गाळप होणाऱ्या उसाची बिले नियमितपणे शेतकऱ्यांना अदा केली जाणार आहेत. तरी शेतकऱ्यांनी कारखान्यास गळीतास जास्तीत जास्त ऊस देऊन सहकार्य करावे, असे आवाहनही यावेळी अध्यक्ष लालासाहेब पवार व संचालक मंडळाने केले आहे.





यावेळी विलासराव वाघमोडे, उदयसिंह पाटील, दत्तू सवासे, प्रतापराव पाटील, दादासो घोगरे, प्रकाश मोहिते, मच्छिंद्र वीर, भागवत गोरे, चंद्रकांत भोसले, तानाजीराव नाईक, राजकुमार जाधव, प्रभारी कार्यकारी संचालक सुधीर गेंगे पाटील आदी उपस्थित होते.

# राष्ट्रीय सेवा योजना शिबिरातून ग्राम चेहेल येथील नागरिकांना व विद्यार्थ्यांना क्षयरोग विषयक डॉ. धनश्री जाधव यांचे मार्गदर्शन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वाशिम : तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय मंगरूळपीर क्षयरोप विभागाच्या वतीने श्री.वसंतराव नाईक व अमरसिंग नाईक महाविद्यालय मंगरूळपीर येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या सुरू असलेला दि.२४ ते ३१ डिसेंबर २०२४ श्रमसंस्कार विशेष शिबिरातून चेहेल येथील ग्रामस्थ नागरिकांना क्षयरोग व एडल्ट बी.सी.जी लसीकरण विषयक जनजागृती मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजक करण्यात आले.या कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष राष्ट्रीय सेवा योजना वरिष्ठ कार्यक्रमाधिकारी पी.आर. तायडे, प्रमुख मार्गदर्शक तालुका आरोग्य अधिकारी डॉ.धनश्री जाधव, सार्वजनिक आरोग्य अधिकारी प्राची घोरपडे, क्षयरोग विभागचे वरिष्ठ पर्यवेक्षक अधिकारी संतोष बल्लाळ, एल टि.एल एस गणेश रघुवंशी, क्षेत्रकार्य आधिकारी प्रदिप पट्टेबहादुर, प्रा.टापरे आय.सी.टी.सी अधिकारी रमेश आडे, यांची उपस्थिती होती. यावेळी डॉ.धनश्री जाधव यांनी आपल्या मार्गदर्शनातून सांगितले की टीबी आजारा पासून घाबरून न जाता जागृत होणे गरजेचे आहे. डॉक्टरांचा सल्ला आणि उच्चार घेऊन आपण टीबी मुक्त होऊ शकतो. एडल्ट बी.सी.जी सुरू असून ही टी.बी.ची लस सर्वांनी घ्यावी आव्हान करीत आपले गाव कुटुंब ग्रामपंचायत टि.बी करावी असे मार्गदर्शनातून केली.

आय.सी.टी.सी अधिकारी रमेश आडे, यांनी विद्यार्थ्यांना HIV एड्स बद्दल मार्गदर्शन करून आजाराचे लक्षणे संदर्भात मार्गदर्शन केले. एवढी नागरिक व विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन आणि एड्स तपासणी करण्यात आली. यावेळी उपस्थित आय.सी.टी.सी अधिकारी रमेश आडे, टेक्निशियन श्री.परदेश, लॅब सायंटिकल अधिकाती वैभव थोरात सदर कार्यक्रम हा जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पांडुरंग ठोबरे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. रेश्मा पाटील, वैद्यकीय अधिकारी डॉ. सतीश परभनकर, पि.पी.एस.एय जिल्हा समन्वयक डीगांबर महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदिप पट्टेबहादुर यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष बल्लाळ यांनी केले. उपस्थित सर्वांचे आभार प्रा.टापरे यांनी मानले. या कार्यक्रमाला श्री.वसंतराव नाईक महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना पथक व राजा प्रसेनजीत अल्पसंख्यांक शिक्षण बहुउद्देशीय संस्था केकतउमरा यांचे विशेष सहकार्य लागले.



# सुनील पुजारी यांचा सेवानिवृत्ती गौरव सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड: तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग येथील ज्ञानदीप कलोपासक मंडळ संचलित आपलं घरच्या धरित्री विद्यालयाचे मुख्याध्यापक, महाराष्ट्र शासनाचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त बहुआयामी व्यक्तिमत्व सुनील श्रीमंतराव पुजारी हे दिनांक ३१ डिसेंबर २०२४ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा गौरव सोहळा मातोश्री हॉल, शेळगी, सोलापूर येथे मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या थाटामाटात व उत्साहात दिनांक ५ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता संपन्न झाला.

प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन करून व दीप प्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मानद शिक्षणतज्ञ एम. डी. देशमुख हे होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महाराष्ट्र शासनाचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासह विविध संघटनांचे, संस्थेचे तब्बल ५२ पुरस्कार प्राप्त असलेले सत्कारमूर्ती सुनील श्रीमंतराव पुजारी यांचा शाल, फेटा, पुष्पहार, सासरचा भर पेहराव आहेर व पाच ग्रॅम सोन्याचे अंगठी, पुष्पगुच्छ देऊन सपत्नीक गौरव करण्यात आला. याप्रसंगी ज्ञानदीप कलोपासक मंडळाचे सचिव ॲड. सयाजी शिंदे, धाराशिव जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुरेश टेकाळे, सचिव अनंत सूर्यवंशी, प्रा. डॉ. सुहास पुजारी, सोलापूर येथील योगीनाथ पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन चंद्रकांत रमणशेट्टी, सेवानिवृत्त पर्यवेक्षक तथा सत्कारमूर्ती सुनील पुजारी यांचे सासरे भीमण्णा गुरव, सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक उमाकांत तीर्थकर, डॉ. गिरीष डी.कुलकर्णी,अकुंश पुजारी शाखाधिकारी ,शरणाप्पा खंडाळकर सामाजिक समाज सेवक, महेश ठेसे चेअरमण, बाबुराव नरुणे अध्यक्ष रामराज्यनगर गृहनिर्माण सोसायटीचे चेअरमन सी. जी. बिराजदार आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

प्रास्ताविक गौरव सोहळा नियोजन समितीचे अध्यक्ष अशोक खानापूर यांनी केले.

सत्कारमूर्ती सुनील पुजारी यांच्या कार्याचे कौतुक उपरोक्त सर्वच मान्यवरांनी आपल्या भाषणात करून गौरव केला. सुनील पुजारी यांनी आजपर्यंत विविध पदावर काम केलेले असल्याने त्यांना बहुआयामी व्यक्तिमत्व म्हणून संबोधले जाते. त्यांचा मित्रपरिवार सर्व क्षेत्रात असल्याने सेवानिवृत्ती गौरव सोहळ्यास विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आवर्जून उपस्थिती लावून आहेर, फेटा, शाल, पुष्पहार, पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार केला. सुनील पुजारी यांच्या सोबत सौभाग्यवती जयश्री ह्या वीर तपस्वी प्राथमिक शाळा अक्कलकोट रोड, सोलापूर येथे सहशिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. त्यांनीही राष्ट्रीय, राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय अनेक पुरस्कार आपल्या कार्यकर्तृत्वातून मिळवले आहेत. सुनील पुजारी यांनी आजपर्यंत तब्बल ७५ वेळा रक्तदान केले आहेत तर त्यांच्या सौभाग्यवती जयश्री यांनीही हम भी कुछ कम नही या उक्तीप्रमाणे तब्बल २२ वेळा रक्तदान करून रुग्णांचे प्राण वाचवून सामाजिक बांधिलकीही जपण्याचे कार्य उभयतांनी केले आहे.

सौ. जयश्री यांनीही आपल्या मनोगतात आपल्या पतीदेवांना लग्नापूर्वी शैक्षणिक जीवनात आर्थिक हलाखीच्या परिस्थित दिवस काढावे लागल्याची जाणीव उपस्थितांना करून दिल्याने उपस्थितांच्या डोळ्यांच्या कडा नकळत आपोआप पाणावल्या होत्या. व तदनंतर नोकरी लागल्यानंतर पासून आजपर्यंतचा सुखाचा प्रवास कथन केला. त्यांना केवळ दोन मुलेच असून ते दोन्हीही इंजिनियर झाले आहेत त्यामुळे त्यांचे जीवन सुखमय असल्याचे नमूद केले. याप्रसंगी शरणाप्पा खंडाळकर, अंकुश पुजारी, गणेश गुरव, सुयश पुजारी, किरण जोगदड , अनिल बामणे, सुशील हब्बू, सूर्यकांत दोडके, प्रा. सुभाष घुगरे, संजीव रगबले, निलेश चौगुले, शिवलिंग शहाबादे, अशोक म्हमाने, महेश ठेसे, महादेव जावळे, बाबुराव नरुणे, वर्गमित्र पत्रकार संजय रेणुके, धरित्री विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल धामशेट्टी, सहशिक्षक रमेश चव्हाण, आण्णाप्पा सातलगावकर, युवराज होळे,कारंजे शुभांगी जगदेवी शंकरशेट्टी, सुरज कांबळे, व्यंकटराव पुजारी आदी मान्यवर उपस्थित होते.

जवळपास ७०० ते ८०० उपस्थितांना साने गुरुजींचे श्यामची आई हे पुस्तक सौभाग्यवती जयश्री पुजारी यांच्या वतीने सप्रेम भेट देण्यात आले. तसेच उपस्थितांना स्नेह भोजनाचा लाभ देण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अणदुर येथील जवाहर महाविद्यालयाचे प्रा. डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांनी केले तर आभार सत्कारमूर्तींचे चिरंजीव सुजय पुजारी यांनी मानले.

# स्वेरीत 'द फ्युजन ऑफ सेमी कंडक्टर एडव्हान्समेंट अँड ए.आयपॅराडायम्स' या विषयावर कार्यशाळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथीलस्वेरीज्कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगआणिबिदर (कर्नाटक) मधीलगुरुनानक देव इंजिनिअरिंग कॉलेजयांच्या संयुक्त विद्यमानेस्वेरीमध्येफॅक्लटी डेव्हलपमेंट प्रोग्राम (एफडीपी) अंतर्गत दि.२३ डिसेंबर ते २९ डिसेंबर २०२४ दरम्यानआठवडाभरशिक्षक विकास कार्यशाळा यशस्वीरित्यासंपन्न झाली.

गुरुनानक देव इंजिनिअरिंग कॉलेजचे अध्यक्षडॉ. सरदार बलबीर सिंगजीव स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी. पी. रोंगे यांच्या मुख्य मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा संपन्न झाली. 'द फ्युजन ऑफ सेमी कंडक्टर एडव्हान्समेंट अँड ए.आयपॅराडायम्स' या विषयावर या कार्यशाळेचे आयोजन केले होते. ही कार्यशाळा हायब्रिड मोडमध्ये आयोजित केली होती. या कार्यशाळेत महाराष्ट्र आणि कर्नाटक मधील शैक्षणिक आणि औद्योगिक क्षेत्रातील जवळपास १४० हून अधिक संशोधक, प्राध्यापकांनी सहभाग घेतला. या कार्यशाळेचे प्रायोजक इन्स्टिटयूट ऑफ इलेक्ट्रिकल अँड इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअर्स(आयईईई) बॉम्बे सेक्शन हे होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी इन्स्टिटयूट ऑफ इलेक्ट्रिकल अँड इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअर्स(आयईईई) बॉम्बे सेक्शनचे अध्यक्ष आनंद घारपूरे आणिसहायक प्राध्यापक डॉ. सुक्रुती कौलगुड यांचे महत्त्वपूर्ण सहकार्यलाभले. या कार्यशाळेतून शैक्षणिक उत्कृष्टता साधण्यासाठी योगदान,शैक्षणिक ज्ञान व व्यावहारिक उपयोग यामध्ये असलेली दरी भरून काढण्यावर अधिक भर दिला गेला. या कार्यशाळेचे आयोजन स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मीनाक्षी पवारयांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. पहिला दिवशी कार्यशाळेच्या उदघाटन प्रसंगी डॉन बॉस्को इन्स्टिटयूट ऑफ टेक्नोलॉजी (डीबीआयटी),मुंबईचे प्राचार्यडॉ. सुधाकरमांडे यांनी 'भारताच्या सेमीकंडक्टर उद्योगाचा उदय'या विषयावर महत्वपूर्ण माहिती दिली. दुसऱ्या दिवशी इन्स्टिटयूट ऑफ इलेक्ट्रिकल अँडइलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअर्स (आयईईई) च्या एपीएस-इडीएस च्या अध्यक्षा आणिआणि फ्र. कोंसिसाओ रोड्रिग्स कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, मुंबईच्या प्रा.डॉ. स्वप्नाली आशिष माकडेययांनी 'व्हीएलएस आय डिझाईनमधील मशीन लर्निंगची भूमिका' याविषयावर व्याख्यान दिले.तिसऱ्या दिवशी हैद्राबाद मधीलमारी लक्ष्मण रेड्डी इन्स्टिटयूट ऑफ टेक्नोलॉजी अँड मॅनेजमेंटचेके. मणिकांतायांनी'सेन्सर' या विषयावर संवादात्मक कार्यशाळा घेतली. चौथ्यादिवशी दोन महत्वाची सत्रे आयोजित केली होती. यामध्ये पहिल्या सत्रात व्हीआयपीटी-एपी विद्यापीठ अमरावती (एपी) यांनी 'सीएमओएस व्हीएलए-सआय' सर्किट्समधील लीकेज कमी करण्याच्या तंत्रांवर' मार्गदर्शन केले.

तर दुसऱ्या सत्रात व्हीएनआयटी, नागपूरचे डॉ. गणेश पाटील यांनी 'नॅनोस्केल डिव्हायसेसचा भूतकाळ,वर्तमान व भविष्य' यावर एक विस्तृत व्याख्यान दिले. पाचव्या दिवशी पुन्हा दोन अतिरिक्त सत्रे आयोजित केली होती त्यात पहिल्या सत्रात मणिपूर (इम्फाळ) च्या एनआयटी मधील डॉ. मनोज जोशी यांनी 'लो पॉवर व्हीएलए-सआय डिझाईन' या विषयावर मार्गदर्शन केले तर दुसऱ्या सत्रात याच महाविद्यालयातील डॉ. वांगखैरकपम वंदना देवी यांनी 'सेन्सर्समधील प्रगती' या विषयावर व्याख्यान दिले. सहाव्या दिवसी रेखा चंद्रराव याच्या 'कृपा वेलनेस अँड फिटनेस सेंटर' मार्फत 'शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी योगासने' करून घेतले. यावेळी समारोप प्रसंगी सहभागी प्राध्यापकांनी या कार्यशाळेचे अनुभव सांगितले. त्यानंतर पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. या कार्यशाळेतील विशेषज्ञ सत्रे, कार्यशाळा आणि संवादात्मक चर्चांमध्ये सेमी कंडक्टर तंत्रज्ञान आणि ए.आय. क्षेत्रातील चालू ट्रेंड्सवर चर्चा करण्यात आली. हायब्रिड मोडमध्ये पार पडलेल्या या कार्यक्रमामुळे सहभागींना ऑनलाईन तसेच प्रत्यक्ष उपस्थित होण्याची संधी मिळाली.




कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती,डॉ. वीरेंद्र डाकुलगी आणिडॉ. किशन सिंगयांनी केले तर यासाठी स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अंतर्गत असलेल्या इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग, कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग आणि इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागातील प्राध्यापकांनी परिश्रम घेतले. डॉ. नीता कुलकर्णी आणि प्रा. रजनी पटेल यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ. सुमंत आनंद यांनी आभार मानले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...



### उल्हासनगर रेल्वे पश्चिम येथील अनाधिकृत वाहनतळावर कारवाई

उल्हासनगर प्रतिनिधी/बाळासाहेब अहिरे : उल्हासनगर रेल्वे स्टेशन पश्चिम येथे अनधिकृत वाहनतळावर कारवाई करण्यात आली. सदर कारवाई करते वेळी मा. श्री अजय साबळे उपायुक्त मालमत्ता, उल्हासनगर महानगरपालिका व माननीय श्री विजय पोवार, सहाय्यक पोलीस आयुक्त, मा. श्री सुखदेव पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाहतूक शाखा व श्रीमती सलोनी निवकर, सहायक आयुक्त प्रभाग समिती क्रमांक तीन, श्रीमती मधुरा केणी, मालमत्ता व्यवस्थापक, उल्हासनगर महानगरपालिका, तसेच संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी हे उपस्थित होते. सदर कारवाईत सुमारे २०० दुचाकी वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. सदर कारवाईत सर्व दूचाकी वाहनांवर पाचशे रुपये दंड आकारण्यात आले व सदर वाहने जप्त करण्यात आली.

### दुचाकी पेट्रोल टाकून पेटवली

सोलापूर (प्रतिनिधी) घरासमोर मोकळ्या जागेत पार केलेली दुचाकी क्रमांक एम एच.१३.बीझेड.११०१ यावर पेट्रोल टाकून नुकसान करण्याचे उद्देशाने पेटवून देऊन २५ हजारांचे नुकसान केले आहे अशा आशयाची फिर्याद जयप्रकाश राजण्णा भंडारी (वय-४४,रा.१५५/३/अ प्लॉट नंबर ३८ झोपडपट्टी गांधीनगर,अक्कलकोट रोड) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरटाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोहेकॉ. नवले हे करीत आहेत.

# शासकीय रुग्णालयात सेवा अधिक दर्जेदार द्या

## औषध व अन्नपदार्थ मधील भेसळीला प्रतिबंध करण्यासाठी काटेकोर उपाययोजना करा; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : शासकीय रुग्णालयात रुग्णांसाठी अधिकाधिक सेवा अद्यावत करून त्या अधिक दर्जेदार द्या. वैद्यकीय शिक्षण अंतर्गत असलेल्या सर्व शैक्षणिक संस्थांच्या बळकटीकरण करा. औषध व अन्नपदार्थ मधील भेसळीला प्रतिबंध करण्यासाठी काटेकोर उपाययोजना करा.

**पुढील १०० दिवसात वैद्यकीय शिक्षण, अन्न व औषध प्रशासन व सामान्य प्रशासन विभागांनी करावयाच्या कामांचा मुख्यमंत्र्यांनी घेतला आढावा**

भविष्यातील आव्हाने ओळखुन प्रशासन गतिमान करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करा अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केल्या.

सह्याद्री अतिथीगृह येथे वैद्यकीय शिक्षण, अन्न व औषध प्रशासन व सामान्य प्रशासन विभाग यांना पुढील १०० दिवस आराखड्याच्या अनुषंगाने बैठक झाली या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ,अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ,राज्यमंत्री माधुरी मिसाळ, राज्यमंत्री योगेश कदम यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, वैद्यकीय शिक्षण विभागाअंतर्गत रक्त दान मोहीम, अवयव दान,स्तनाचा कर्करोग जनजागृती आणि उपचार, लठ्ठपणा जनजागृती आणि उपचार, मिशन थायरॉईड, अंधत्व प्रतिबंधात्मक उपाय योजना,मिशन मौखिक आरोग्य मोहीमांची प्रभावी अंमलबजावणी करा. वैद्यकीय शिक्षण महाविद्यालय परिसरातील विद्यार्थी आणि परिसर सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही कार्यान्वित करणे, आयुर्वे



दिक महाविद्यालयामार्फत प्रकृती परीक्षण अभियान, योगा सेंटरची स्थापना, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या छतावरती सौर ऊर्जा यंत्रणा कार्यान्वित करणे, वैद्यकीय संशोधन केंद्रांचे बळकटीकरण करणे, महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना अधिक लोकाभिमुख करा व योजनेत सुधारणा करणे, वैद्यकीय शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेपासून ते उत्तीर्ण होईपर्यंतच्या शैक्षणिक प्रक्रियेचे व्यवस्थापन पुढील शंभर दिवसात प्राधान्याने करा.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, अन्न व औषध प्रशासन विभागात ऍलोपॅथी औषध निर्माते, रक्तपेढ्या, शासकीय रुग्णालयातील सर्व औषधांच्या नमुन्यांची गुणवत्ता तपासणी,फूड टेस्टिंगसाठी लॅबोरेटरी सुरू केली आहे तेथील कामकाज सुरू करणे या सर्व बाबी प्राधान्याने पूर्ण कराव्यात. दुध भेसळ रोखण्यासाठी कठोर उपाययोजना करा,अन्न व औषध अंतर्गत नोंदणी व परवाने तपासणी,मंदिर व देवस्थाने येथील प्रसाद गुणवत्ता तपासणी ही कामे प्राधान्याने करा. मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की,राज्यात कार्यरत अधिकारी व कर्मचारी कर्मचाऱ्यांशी निगडित सेवा अधिक सुलभ होण्यासाठी भर देण्यात यावा. कर्मचाऱ्यांच्या क्षमता बांधणीसाठी वेगवेगळे प्रशिक्षण व उपक्रम राबवा. विभागांतर्गत परीक्षा, नियुक्ता वेळेत देणे, बदल्या, गोपनीय अहवाल, स्थायित्व लाभ, सेवानिवृत्ती प्रकरणाबाबतची कार्यपद्धती सुलभता आणणे,वैद्यकीय बिलांची प्रतिपूर्ती आणि पदोन्नतीचा मानिव दिनांक देणे त्याचबरोबर कर्मचाऱ्यांशी निगडित सर्व माहिती ऑनलाईन उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न करावी.भविष्यातील आव्हाने स्वीकारण्यासाठी आणि प्रशासन गतिमान करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता,ब्लॉकचेन सायबर सुरक्षितता, सांख्यिकीय माहिती गोळा करणे यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण अधिकारी आणि कर्मचारी यांना द्या असेही त्यांनी सांगितले.

बैठकीला मुख्य सचिव सुजाता सौनीक, अपर मुख्य सचिव (वित्त) विभाग ओ.पी.गुप्ता, मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे,अपर मुख्य सचिव दिनेश वाघमारे,अपर मुख्य सचिव (नियोजन) राजगोपाल देवरा, सामान्य प्रशासन विभागाच्या प्रधान सचिव व्ही. राधा, प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव श्रीकर परदेशी, आयुक्त राजीव निवतकर, अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त राजेश नार्वेकर उपस्थित होते.

# लोकशाहीचा चौथा स्तंभ मजबूत व्हावा : संपतराव डुंबरे




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/ प्रतिनिधी

श्री माणकेश्वर वाचनालय निफाड येथे दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती तथा पत्रकार दिन उत्साहात साजरा करण्यात आला.लोकशाहीची मूल्ये जनमानसात रुजवायचे असतील तर लोकशाहीचा चौथा स्तंभ हा मजबूत झाला पाहिजे असे प्रतिपादन निफाड शेतकरी सहकारी संघाचे चेअरमन संपत डुंबरे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात केले. तत्पूर्वी नाशिक जिल्हा परिषदेचे आरोग्य आणि शिक्षण विभागाचे माजी सभापती राजेंद्र मोगल यांच्या हस्ते आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. आपल्या प्रास्ताविकात अध्यक्ष मधुकर शेलार यांनी पत्रकारिते पुढील आव्हाने आणि निष्पक्ष पत्रकारिता यांचे महत्त्व विषद केले. याप्रसंगी निफाड शहर आणि परिसरातील पत्रकार पंढरीनाथ सोनवणे, आण्णा बोरगुडे, माणिक देसाई, संतोष गिरी, सुनील कुमावत, राहुल दवते, राजेंद्र थोरात, देविदास बैरागी, योगेश कर्डिले, किशोर सोमवंशी, सागर निकाळे, राहुल कुलकर्णी यांचा सत्कार शाल आणि लेखणी देऊन करण्यात आला. भाऊसाहेब फटांगडे यांचा वडाळी नजीक विकास सोसायटीच्या चेअरमन पदी निवड झाल्याबद्दल, तर रितेश कापसे यांचा निफाड कॉलेज इन अध्यक्ष पदी निवड झाली , असून कुमारी आचल शर्मा हिचा सीए परीक्षेत उत्तीर्ण झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. पत्रकार संतोष गिरी, अण्णा पाटील बोरगुडे, माणिकराव देसाई राजेंद्र थोरात यांनी मनोगत व्यक्त केले,या कार्यक्रमास माणकेश्वर वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार, उपाध्यक्ष डॉ. मेघा जंगम, चिटणीस प्रा. बाळासाहेब कापसे, सहचिटणीस राहुल दवते, हिशोब तपासणी दत्ता काका उगावकर,संचालक नईम पठाण, सुहास सूरळीकर प्रा. महेश बनकर, राजेंद्र खालकर सुनील चिखले, सुजाता तनपुरे, माजी संचालक अशोक पगारे, संजय घुमरे, माजी सरपंच रघुनाथ कुंदे, प्रतीक वडघुले, रावसाहेब कुंभार्डे, राजाबाबू शर्मा, प्रफुल्ल कुलकर्णी,वाचनालयाचे कर्मचारी विद्या बंद्रे,नंदकुमार पुंड ,अनिता ईस्ते आणि नागरिक उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब कापसे यांनी तर आभार सुनील चिखले यांनी मानले

# श्री.वसंतराव नाईक महविद्यालयच्या विशेष श्रमसंस्कार शिबीरात श्री पंकजपाल महाराज यांचा प्रबोधनात्मक कार्यक्रम



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/मंगरूळपिर :- स्थानिक श्री. वसंतराव नाईक कला व श्री.अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालय मंगरुळपीर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष मा.आ.अ. राठोड साहेब व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एम.वडगुले यांच्या मार्गदर्शना खाली रासेयो विशेष श्रमसंस्कार शिबीर दि. २५ ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत दत्तक ग्राम चेहेल येथे संपन्न झाले.

या प्रसंगी शिबिरांतर्गत सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून विदर्भातील सुप्रसिद्ध समाज प्रबोधनकार सत्यपाल महाराजांचे शिष्य श्री पंकजपाल महाराज यांचा समाज प्रबोधन कार्यक्रम दिनांक २९ डिसेंबर रोजी संपन्न झाला.या कार्यक्रमाचे प्रस्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.पी.आर.तायडे यांनी केले. श्री पंकज पाल महाराजांनी सर्व शिबिरार्थी व गावातील सर्व ग्रामस्थांना अंधश्रद्धा कर्मकांड बुवाबाजी स्वच्छता निर्मल ग्राम हुंडाबळी स्त्रीभ्रूणहत्या बालविवाह बालगुन्हेगारी व्यसनमुक्ती आणि आजच्या शैक्षणिक वातावरणावर सखोल असे प्रबोधनातून मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला जवळपास ९०० ते १००० ग्रामस्थांची उपस्थिती लाभली हा कार्यक्रम रासियो कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक डॉक्टर पी आर तायडे यांच्या नेतृत्वात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.पी. आर.तायडे यांनी केले.या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. दत्तात्रय चौधरी अध्यक्ष गणपती संस्थान चेहेल, विनोद भाऊ चौधरी अध्यक्ष तंटामुक्ती समिती, सुनील भाऊ चौधरी पोलीस पाटील चेहेल, विनोद भाऊ राठोड प्रतिष्ठित नागरिक या प्रमुख अतिथीची उपस्थिती लाभली.

# बारामती उप माहिती कार्यालयात पत्रकार दिन साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बारामती/प्रतिनिधी : बारामती उप माहिती कार्यालयात मराठी पत्रकार दिनाचा कार्यक्रम पत्रकारांच्या उपस्थितीत उत्साहात पार पाडला. दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस उपविभागीय अधिकारी वैभव नावडकर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या कार्यक्रमास तहसीलदार गणेश शिंदे उप माहिती कार्यालयातील कर्मचारी,पत्रकार स्वप्निल कांबळे, मन्सूर शेख ,संतोष जाधव,अजिंक्य सातकर, सुनिल शिंदे, उमेश दुबे, दशरथ मांढरे, चेतन शिंदे, सुरज देवकाते, आनंद धोंगडे,निलेश जाधव, संतोष सवाने, महेंद्र गोरे,संतोष शिंदे,संदीप साबळे, संतोष पांढरे,भारत तुपे,तैनुर शेख उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे आयोजन ऑल इंडिया संपादक संघ महाराष्ट्र राज्य, संपादक पत्रकार संघ बारामती, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ बारामती, प्रेस क्लब बारामती, व्हॉइस ऑफ मीडिया बारामती, वृत्तपत्र संपादक पत्रकार संघ बारामती,पत्रकार संघ बारामती,भारतीय पत्रकार संघ या सर्व संघटनांच्या वतीने करण्यात आले होते.

यावेळी बारामती उपविभागीय अधिकारी श्री.नावडकर व तहसीलदार श्री.शिंदे यांनी पत्रकारांना गुलाब पुष्प देऊन सन्मान करून शुभेच्छा दिल्या.

# राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेत नाशिकच्या मुलींच्या संघाला तृतीय पारितोषिक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : नाशिक येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेत सातारा शहर संघाने विजेतेपद पटकावले.अहिल्यानगर संघ उपविजेता ठरला. सातारा ग्रामीण संघाने तृतीय क्रमांक संपादन केला. मुलींच्या गटात मुंबई उपनगर संघाने विजेतेपद तर सागली संघाने उपविजेतेपद व नाशिक तृतीय क्रमांक संपादन केले.

टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र व टेनिस क्रिकेट असोसिएशन नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत मुलांच्या गटात एकूण २९ संघानी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी




भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशन व टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र सचिव मीनाक्षी गिरी, टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र उपाध्यक्ष विलास गिरी, महिला विभाग महाराष्ट्र अध्यक्ष धनश्री गिरी,घनःश्याम सानप (अहिल्यानगर),, शफी शेख (छत्रपती संभाजीनगर), महेश मिश्रा (ठाणे), , सिद्धेश गुरव (रत्नागिरी), इंद्रजीत वाले (धाराशिव), संदीप पाटील (मुंबई उपनगर), विलास गायकवाड (नाशिक) संदीप खलाणे नंदुरबार, ज्ञानेश्वर जाधव पुणे, रंजीत कातडे वाशिम जिल्हा कुशाल देशमुख जळगाव जिल्हा, आनंद गिरी बीड जिल्हा, नितीन सराफ अमरावती यांची प्रमुख उपस्थिती होती.

राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना सातारा आणि अहिल्यानगर जिल्हा यांच्यात झाला. सातारा संघाने शानदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले. अहिल्यानगर संघाने चांगले प्रयत्न केले. परंतु, अहिल्यानगर संघाला उपविजेते पदावर समाधान मानावे लागले. तसेच सातारा ग्रामीण संघाला तिसरा क्रमांक, चौथा क्रमांक ,पुणे ग्रामीण संघाला मिळाला. मुलींच्या गटात अंतिम सामना मुंबई उपनगर आणि सांगली या संघात झाला. मुंबई उपनगर संघाने उत्कृष्ट खेळ करत विजेतेपद पटकावले. सांगली संघ उपविजेता ठरला. तिसरा क्रमांक नाशिक संघाला मिळाला. नाशिक मुलींच्या संघामध्ये कर्णधार रागिनी आहेर,,आराध्या सालमुठे,श्रध्दा मोगल,वेदिका कुशारे,अनुष्का कुशारे,स्वानंदी बिदे तनिष्का निकम,श्रेयसी माळी,कृतिका मोगल मोक्षदा जाधव,धनश्री पातळे याना तृतीय क्रमांक मिळवल्याबद्दल भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या सचिव मीनाक्षी गिरी ,महाराष्ट्र उपाध्यक्ष विलास गिरी ,धनश्री गिरी , धनु भाऊ लोखंडे, नाशिक सचिव विलास गायकवाड यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या

**मंदिर समितीच्या वतीने चेअरमन महेश इंगळे यांच्या हस्ते सत्कार**

**स्वामी दर्शनानंतर स्टार कब्बडीपटू पंकज मोहीते यांचे मनोगत**

# स्वामीकृपेने कब्बडीच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या नावलौकीकाने जीवनाचे सार्थक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी

कब्बडी हा आपल्या राष्ट्रीय स्तरावरचा मर्दानी खेळ आहे. आयपीएलच्या धर्तीवर भारतातील काही मोठया उद्योजकांनी कब्बडी या खेळास आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रो. कब्बडी लीगच्या माध्यमातून मोठे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. या माध्यमातून देशभरातील कब्बडी खेळाडूंना आपले कौशल्य सिध्द करण्याची सुवर्णसंधी प्राप्त झाली आहे. स्वामी कृपेने मलाही ही संधी लाभल्याने कब्बडीच्या माध्यमातून लाभलेल्या आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या नावलौकीकाने जीवनाचे सार्थक झाले असल्याचे मनोगत प्रो.कब्बडी लीग मधील पुणेरी पलटणचा स्टार खेळाडू पंकज मोहीते यांनी व्यक्त केले.

प्रो कब्बडी लीग २०२४ स्पर्धांच जेतेपद पुणेरी पलटणने पटकावल्यानंतर कब्बडीपटू पंकज मोहीते यांनी नुकतेच येथील श्री.वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरास सपत्निक भेट देवून श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदीर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे व प्रथमेश इंगळे यांनी कब्बडीपटू पंकज मोहीते व त्यांच्या सुविद्य पत्नी यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून यथोचित सन्मान केला. यावेळी पंकज मोहीते बोलत होते.

यावेळी बोलताना प्रथमेश इंगळे यांनी मी ही कब्बडी खेळाचा व पुणेरी पलटण संघाचा मोठा चाहता आहे. नुकतेच पार पडलेल्या प्रो कब्बडी लीग २०२४ स्पर्धांच जेतेपद पुणेरी पलटणने जिंकली. ७४ दिवसांच्या अतितटीच्या १२ संघांमध्ये रंगलेल्या सामन्यानंतर हरयाणा स्टीलर्स आणि पुणेरी पलटण यांनी अंतिम फेरीत एन्ट्री मारली होती. पुण्याने हरयाणावर २८-२५ ने मात दिली. अवघ्या ३ गुणांनी पुण्याने हरयाणाला पराभूत केलं. पुणेरी पलटणने नाणेफेकीचा कौल जिंकला आणि कोर्टात राहणं पसंत केलं. हरयाणाच्या विनयची पहिली रेड फुकट गेली. त्यानंतर पुण्याने



हरयाणावर आघाडी घेण्यास सुरुवात केली. पहिल्या ब्रेकमध्ये पुण्याने हरयाणा स्टीलर्सवर १०-१३ गुणांनी आघाडी घेतली. दुसऱ्या डावातही पुण्याने आघाडी घेतली. पण एक क्षण असा आला की या दोन्ही संघातील अवघ्या काही गुणांचं होतं. त्यामुळे कोण बाजी मारणार याची उत्सुकता वाढली होती. मध्येच जल्लोष करणारा प्रेक्षकवर्ग शांत होत होता. तर कधी आपल्या बाजूने कल लागला जोराने ओरडत संघाला साथ देत होती. दुसऱ्या डावात जेव्हा अतितटीचा सामना सुरु होता पंकज मोहितेची रेड पुण्याला फायदेशीर ठरली. त्याच्यचा ४ गुणांमुळे पुणेरी पलटणला फायदा होवून अंतिम सामन्यात विजय झाल्याने व पुणेरी पलटणला अजिंक्यपद प्राप्त झाल्याने माझ्यासह पुणेरी पलटणच्या तमाम चाहत्यांना विशेष आनंद झाला असल्याचे सांगून या पुढेही पंकज मोहीते यांनी असेच निर्भेळ यश संपादन करीत रहावे हीच स्वामींच्या चरणी मनोकामना असल्याचे मनोगत व्यक्त केले.

यावेळी मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, व्यंकटेश पुजारी, मोहन जाधव, विपूल जाधव, शिवशरण अचलेर, अविनाश क्षीरसागर, सागर गोंडाळ, प्रसाद सोनार, श्रीकांत मलवे इत्यादी उपस्थित होते.

## थोडक्यात...

### राजेंद्र गायकवाड यांची सोलापूर जिल्हाध्यक्षपदी निवड



अक्कलकोट : दि.०६/०१/२०२५ रोजी रुग्ण हक्क संघर्ष समिती संस्थापक प्रमुख ड विजयभाऊ पंडित यांच्या अध्यक्षतेखाली रुग्ण हक्क संघर्ष समिती पुणे शहर कार्यालयात बैठक घेण्यात आली. यावेळी संदिपजी सुतार सोलापूर जिल्ह्या संघटक यांनी सुचवलेले सामाजिक व राजकीय क्षेत्रात अनेक वर्षांपासून कार्यरत असणारे व सामाजिक क्षेत्रातील त्यांची आवड व रुग्ण हितार्थ त्यांचे कार्य पाहून त्यांची सोलापूर जिल्हाध्यक्ष पदीराजेंद्र गायकवाड यांची निवड करण्यात आली. संपूर्ण जिल्ह्यात रुग्ण हक्क व हितार्थ काम करुन संघटना वाढविण्यासाठी प्रयत्न असेल असे ही त्यांनी आपले मत मांडले, यावेळी संस्थापक सचिव विश्वासजी कुलकर्णी, उपाध्यक्ष संजय सुरवसे, सह सचिव संतोष सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुणे जिल्हाध्यक्ष रवीजी गजे, संघटक किरण बडे, महिला जिल्हाध्यक्षा सौ मंगल अशोक जाधव, व पिंपरी चिंचवड शहराध्यक्षा सौ माधुरी कोलते, उपाध्यक्षा किरण पाचपांडे, पुणे शहराध्यक्ष संजय बावळेकर, गायत्री देभे, कल्पना जाधव, सुजाता गायकवाड, मुंबई महिला निषा अत्तार, पुणे संघटक राहुल ताटे, शशांक घाडगे आदी कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी त्यांच्या निवडीबद्दल अभिनंदन व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### सोन्याचे दागिने लंपास

**सोलापूर** : सोलापूर ते धुरखेडा एसटी बसने प्रवास करत असताना बसमधील गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्याने फिर्यादी कीर्ती प्रवीण बिराजदार (वय-२४,रा.बनशंकरी नगर,शेळगी) यांच्या जवळील एक लाख दहा हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ६ जानेवारी रोजी सकाळी साडेअकरा ते साडेबारा वाजण्याच्या सुमारास सोलापूर एसटी स्टँड येथे घडली.याप्रकरणी कीर्ती बिराजदार यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोहेकॉ. पाडवी हे करीत आहेत.

# शेतकरी सात-बारा उताऱ्यापासून तर विद्यार्थी दाखल्यामुळे वंचित

## अक्कलकोट तालुक्यातील तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांचे कामबंद आंदोलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील महसूल अधिकारी,तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांनी ६ जानेवारी २०२५ पासुन बेमुदत कामबंद आंदोलन सुरु केले असुन जोपर्यंत शासन मागण्या मान्य करून शासन निर्णय काढत नाही.तोपर्यत काम बंद आंदोलन सुरु राहणार असल्याचे महसुन संघाच्या अध्यक्षांकडून सांगण्यात आले आहे.या कामबंद आंदोलनामुळे 'महसूल'मध्ये शुकशुकाट दिसुन आले.

**महसूल अधिकारी, तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांचे मुख्य चार मागण्या शासनानी तात्काळ मार्गी लावावे. जोपर्यंत शासन मागण्या मान्य केले जात नाही तोपर्यंत आंदोलन सुरू राहणार आहे.**
**– राहूल बिराजदार (तालुका अध्यक्ष तलाटी संघटना अक्कलकोट)**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अतिकालिक भत्ता, लॅपटॉप व स्कॅनरसह प्रिंटर्स मिळावे, साझा पुनर्रचनेनुसार साझा फोड करण्यात यावे, ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांची सेवाजेष्ठता यादी प्रसिद्ध करावे,या अत्यावश्यक चार मागण्या तात्काळ पुर्ण करण्यात यावे.अशी मागणी करण्यात आले होते. मागण्या संदर्भात प्रशासनानी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे महसुलच्या अधिकारी, कर्मचाऱ्यात प्रचंड नाराजी आहे. ८डिसेंबर,२०२४ च्या जिल्हासंघाच्या बैठकीत सर्वानुमते ठरल्याप्रमाणे तालुक्यातील सर्व ग्राम महसूल अधिकारी व तलाठी,संवर्गातील मंडळ अधिकाऱ्यांनी दि.६ जानेवारी २०२५ पासून बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले आहे. तलाठी व मंडळ अधिकारी यांनी कामबंद आंदोलन सुरू केल्याने तलाठी विभागातील सात-बारा उतारे, फेरफार, बोजा नोंदीचे काम,विद्यार्थ्यांना लागणारे उत्पन्नाचे दाखले,ही सर्व कामे बंद आहेत. महसूल कामकाजांचा महत्वाचा दुवा असलेला तलाठ्याने काम बंद आंदोलन केल्याने नैसर्गिक आपत्ती वगळता सर्व कामे ठप्प झाली आहेत.खातेदारातून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.जोपर्यंत शासन मागण्या मान्य केले जात नाही तोपर्यंत आंदोलन सुरू ठेवणार असल्याचा पवित्रा तलाठी संघटनेने घेतल्याने शेतकऱ्यांना याचा फटका सहन करावा लागत आहे.

**महसुल तलाट्यांच्या कामबंद आंदोलनामुळे सात-बारा उतारे, फेरफार, बोजा नोंदीचे काम, विद्यार्थ्यांना लागणारे उत्पन्नाचे दाखले हे सर्व कामे बंद आहेत.शासनानी महसूल अधिकारी, तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांचे प्रश्न तात्काल सोडवावे. जेणेकरून लोकांचे हाल होऊ नये.**
**– आनंद बुक्कानुरे (तालुकाप्रमुख शिवसेना उबाठा अक्कलकोट)**

## पत्रकारांनी सत्ताधारी घटकांच्या विरोधात ठाम भूमिका घेतली पाहिजे : अमरजित पाटील



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पत्रकारांनी प्रस्थापित राजकीय सत्तेच्या विरोधातच लिहिले पाहिजे. समाजातील उपेक्षित, वंचित घटकांचा आवाज होऊन पत्रकारिता केली पाहिजे. पत्रकार हा निर्भीड असला पाहिजे. त्याने प्रस्थापित घटकांच्या विरोधात सातत्याने आवाज उठविला पाहिजे. समाज जीवनात सत्ताधारी वर्ग हा वेगवेगळ्या माध्यमातून समाजातील सामान्य घटकांचे शोषण करत असतो. सत्तेच्या बळावर तो आर्थिक स्वरूपाचा भ्रष्टाचार करत असतो. तेंव्हा अशा भ्रष्टाचाराला विरोध करण्याचे कार्य त्याने निष्ठेने केले पाहिजे. तरच पत्रकार लोकशाही व्यवस्थित टिकवू शकतील. असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य अमरजित पाटील यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात प्रसिद्धी विभाग, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्र व इंटायर मल्टीमिडिया अँड मास कम्युनिकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी पत्रकार दिनानिमित्त आयोजित पत्रकार सन्मान समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे, उपप्राचार्य डॉ. तुकाराम अनंतकवळस, उपप्राचार्य डॉ. राजेश कवडे, ज्येष्ठ पत्रकार सिद्धार्थ ढवळे, शिवाजी शिंदे, आदी मान्यवर उपस्थित होते.

अमरजित पाटील पुढे म्हणाले की, समाज बदलण्याची ताकद केवळ युवक आणि पत्रकार यांच्यामध्येच असते. पत्रकारांनी समाजातील सर्व क्षेत्रातील प्रश्नांचा अभ्यास केला पाहिजे. समाजाचे प्रश्न वृत्तपत्रातून मांडले पाहिजेत. प्रसार माध्यमाचे बदललेले स्वरूप विचारात घेऊन आपली लेखणी गतिशील बनवली पाहिजे. समाजात अनेक पत्रकारांनी जीवावर धोका पत्करून पत्रकारिता केली आहे. विविध समस्या आणि प्रश्नांना भिडण्याची ताकद लेखणीत असते. मराठी पत्रकारितेला समाज सुधारणेचा वारसा लाभलेला आहे.

अध्यक्षीय भाषणात उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे म्हणाले की, पत्रकारांकडून समाजाला मोठी अपेक्षा असते. लोकशाही जिवंत ठेवून तिचे लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्याची जबाबदारी ही पत्रकारांची असते. आर्थिक लाभाविषयीची लालसा दूर ठेवून प्रामाणिक पत्रकारिता समाजाचे प्रश्न सोडविण्यास सक्षम आहे. प्रास्ताविक आणि स्वागत प्रा. डॉ. दत्ता डांगे यांनी केले. तर प्रमुख मान्यवरांचा परिचय प्रा. डॉ. रविराज कांबळे यांनी करून दिला. या कार्यक्रमात पंढरपूर शहर आणि परिसरातील विविध वृत्तपत्रे, न्यूज चॅनेल, वृत्तवाहिन्या, न्यूज पोर्टलचे संपादक, पत्रकार, वार्ताहर सहभागी झाले होते. त्यांचा गुलाब पुष्प, पेन आणि डायरी देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सारिका भांगे यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा. दत्तात्रय खिलारे यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. डॉ. विनया पाटील, प्रा. धनंजय वाघदरे, प्रा. राजेंद्र मोरे, प्रा. नानासाहेब कदम, अमोल जगदाळे, अभिजित जाधव, अमोल मोरे, समाधान बोंगे आदींनी परिश्रम घेतले.

## अवजड वाहतूक पंढरपूर शहरांमध्ये न येता बाहेरून वळवण्यात यावी



**पंढरपूर शहर काँग्रेस कमिटीचे पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांना निवेदन**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहरामध्ये लिंक रोड हा बायपास रोड असतानाही अवजड वाहतूक शहरातून होत आहे त्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे. मात्र याकडे वाहतूक शाखेकडून डोळेझाक होताना दिसत आहे तरी बायपास रोडला दिशादर्शक फलक बसवून ती वाहतूक शहरांमध्ये न येता बाहेरून वळवण्यात यावी अशी मागणी शहर काँग्रेसकडून करण्यात आले आहे.

शहर पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांना या संदर्भात निवेदन देण्यात आहे या निवेदनात पुढे म्हटले आहे की पंढरपूर शहरात जड वाहतुकीचे वजन वाढले आहे दररोज सकाळी व दुपारच्या वेळेस शहरात येणाऱ्या अवघड वाहनांना कारवाई करण्यात यावी तसेच शहरातील गाड्यांची संख्या लक्षात घेता प्रत्येक मार्गावर वाहतूक कोंडी होत आहेत तरी महत्त्वाच्या गर्दीच्या चौकात सिग्नल बसून ती वाटप सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करावे तातडीने सिग्नल व्यवस्था चालू न झाल्यास शहरातून होणारे जड वाहतूक सकाळी व दुपारी त्यावेळेस बंद न केल्यास याविरोधी आंदोलन उभे करावी लागेल असा इशारा पंढरपूर शहर काँग्रेस कमिटी शहराध्यक्ष अमर सूर्यवंशी यांनी या निवेदनाद्वारे दिले आहे

या निवेदनाची प्रत सोलापूर लोकसभा काँग्रेसच्या खासदार प्रणिती ताई शिंदे यांना पाठवण्यात आले असून यावेळी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष संदीप शिंदे, गणेश माने, महेश अदटराव, आधी काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते

## दादाजी भूसे यांचे चर्चासत्र यशवंतराव चव्हाण सेंटर नरीमन पॉईट मुंबई येथे संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

राज्याचे शिक्षणमंत्री दादाजी भूसे , शिक्षक आ. -ज्ञानेश्वर म्हात्रे , शिक्षण आयुक्त -सचिंद्र प्रतापसिंह , राहुल रेखांवर, राज्य मंडळाचे अध्यक्ष संपत गोसावी, कृष्णकुमार पाटील, संपत सुर्यवंशी, कृष्णकुमार पाटील,महेश पालकर,सर्व विभागाचे शिक्षण उपसंचालक , शिक्षण निरीक्षक व राज्यातील नामांकित शिक्षण संस्था पदाधिकारी यांच्या समवेत नुकतेच गुणवत्तापूर्ण आनंददायी शिक्षण पद्धती वर यशवंतराव चव्हाण सेंटर नरीमन पॉईंट मुंबई येथे चर्चासत्र संपन्न झाले.

या प्रसंगी शिक्षण विभागाच्या सर्व संबंधित घटक , विविध शैक्षणिक समस्या , संस्थेच्या अडचणी , उपाययोजना , विविध संस्थाचे नवोपक्रम , अडचणीवर व समस्यांवर मात करून गुणवत्तेसाठी प्रयत्नाची पराकाष्टा करणे इ .गोष्टीवर चर्चा करण्यात आली . शिक्षणमंत्री यांच्या निदर्शनात वेतनेत्तर अनुदानात वाढ करणे, २५% आरटीई प्रवेशाची थकीत शिष्यवृत्ती , एकच पश्रळपश युडायस असावे . पश्रळपश व अशैक्षणिक कामे कमी करावी ,पवित्र पोर्टल च्या अडचणी . बिंदू नियमावली . रोष्टर बाबत आयुक्ताची भुमीका . शालार्थ आयडी व संच मान्यता दुरुस्ती उपसंचालकांना अधिकार द्यावे . नवीन शैक्षणिक धोरण प्रभावी राबवणे . शिक्षकांचे त्वरीत प्रशिक्षण घेणे . प्राथमिकला अंगणवाडी व बालवाडी जोडावी . संस्थेवर अनेक दुदैवी घटनेना सामोरे जावे लागते .शाळा व संस्था पदाधिकारी सुरक्षा कायदा करण्यात यावा . शिक्षकेत्तर भरती प्रक्रिया राबावी व मानधन वाढून द्यावे . टप्पा अनुदान मंजूर करावे . ५ वी व ८ वी चा वर्ग जोडल्यामुळे विद्यार्थी संख्येचा प्रश्न निर्माण झालेला आहे . अर्धवेळ शिक्षक . अतिरिक्त .मुख्याध्यापक पदाला संरक्षण मिळावे .पोषण आहार बाबत अनेक अडचणी निर्माण झालेल्या आहेत त्या सोडवाव्यात . अनुदाना व्यतिरिक्त इतर सवलती पोषण आहार , शिष्यवृत्ती , इ . इंग्रजी माध्यमांना लाभ मिळावा इ . मागण्या करण्यात आल्या . शाळा दत्तक घेणे . निकोप शालेय तपासणी घ्यावी . सातत्यपूर्ण अध्ययन क्षमता तपासण्यात याव्या . सर्व घटकांनी विद्यार्थी केंद्रीत ठेऊन फक्त गुणवत्ता व सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करावे असे आवाहन शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी केले . महाराष्ट्र राज्य मुखाध्यापक संघाचे सचिव एस .बी देशमुख , प्रदिप सांगळे , बी के नागरे , आर डी निकम , राजेंद्र निकम चर्चासाठी नाशिकचे प्रतिनिधी उपस्थित होते.



**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नशामुक्त नवी मुंबई अभियानाचे उद्घाटन**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन**

# युवकांनो...ड्रग्स मुक्त समाज घडविण्यासाठी सैनिक म्हणून पुढे या..!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे (जिमाका) : देशाचे आणि समाजाचे नुकसान करीत असलेल्या न दिसणाऱ्या शत्रूशी लढण्यासाठी समाजाने एकत्र येणे आवश्यक आहे. ड्रग्स व तत्सम अंमली पदार्थांच्या माध्यमातून काही लोक समाज पोखरण्याचे दुष्कर्म करीत आहेत. त्यांना आळा घालण्यासाठी सजग राहा, सैनिक म्हणून पुढे या.. हीदेखील एक प्रकारची देशभक्ती आणि समाजाची सेवा आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या वतीने आयोजित नशामुक्त नवी मुंबई अभियानाचे वाशी येथील सिडको ऑडिटोरियम येथे उद्घाटन झाले. त्यावेळी ते बोलत होते. आर्ट ऑफ सायलेन्स (art of silence) या मूकनाट्याने कार्यक्रमाची सुरुवात झाली. तर या उपक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याच्या हस्ते नशामुक्त नवी मुंबई अभियानाच्या चित्रफितीच्या प्रकाशनाने झाले.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, ड्रग्समुळे स्वतःच्या आयुष्यासोबत आपण देशाचेही नुकसान करतो हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे. प्रवाहासोबत जाणारे अनेक असतात, परंतु चांगले करण्यासाठी प्रवाहाविरुद्ध जावे लागते, त्यासाठी शारीरिक ताकदीपेक्षा मानसिक ताकद गरजेची आहे. नशामुक्त नवी मुंबई हे अभियान अतिशय महत्वाचे आहे. गृह खात्याच्या पहिल्याच बैठकीत पोलिसांना सांगितले की, आपल्याला ड्रग्स विरुद्ध मोठी लढाई लढायची आहे. सरळ लढाई करता येत नाही म्हणून अंमली पदार्थांच्या माध्यमातून देश पोखरण्याचा प्रयत्न केला जातोय. ते म्हणाले, देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी गृह विभागासंबंधी घेतलेल्या बैठकीत कॅनडाचे उदाहरण दिले. ड्रग्जमुळे कॅनडा सामाजिकदृष्ट्या पूर्णपणे कोलमडून पडला. मात्र भारत ड्रग्जविरूद्धची ही लढाई जिंकू शकतो. देशातील सर्व राज्यांनी एकमेकांना सहकार्य करीत ही लढाई एकत्र लढायला हवी. सर्वांनी एकत्र येवून संपूर्ण भारत ड्रग्स मुक्त करायचा आहे, हा आपला निर्धार असायला हवा. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाकडून जाहीर करण्यात आलेल्या ८८२८ ११२ ११२ या टोल फ्री क्रमांकाचा प्रभावी वापर करावा.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी नशामुक्तीसाठी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाने घेतलेल्या पुढाकाराबद्दल नवी मुंबई पोलीस दलाचे अभिनंदन केले. तसेच सेलिब्रिटी म्हणून जॉन अब्राहम यांच्या कामाबद्दलही कौतुक केले. पुनःश्च एकदा निर्धार करु या नशामुक्तीसाठी लढण्याचा, ड्रग्स फ्री नवी मुंबई करण्यासाठी सैनिक होण्याचे उपस्थितांना आवाहन केले.





अभिनेता जॉन अब्राहम यांनी आपल्या मनोगतात नशामुक्त नवी मुंबई या अभियानाच्या आयोजनाबद्दल नवी मुंबई पोलिसांचे अभिनंदन करून आपले आयुष्य हे शिस्तमय असावे. आपण आपल्या आचरणाने मित्र परिवारामध्ये आदर्श निर्माण करावा आणि एक उत्तम नागरिक म्हणून जगावे, असे आवाहन केले.

याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना वनमंत्री गणेश नाईक म्हणाले की, चांगल्या कामाचा ध्यास, हीच खरी नशा आहे. सर्वांनी चांगल्या कामाचा ध्यास घ्यावा. नवी मुंबई महानगरपालिका सर्व आघाड्यांवर प्रथम क्रमांकावर आहे. तसेच नशामुक्त अभियानातही अव्वल राहील, हा विश्वास आहे.

सुरुवातीस नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी आपल्या प्रास्ताविकात नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाने आतापर्यंत राबविलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

यावेळी वनमंत्री गणेश नाईक, प्रख्यात अभिनेता आणि नशामुक्त नवी मुंबई या उपक्रमाचे आयकॉन जॉन अब्राहम, आमदार मंदा म्हात्रे, प्रशांत ठाकूर, महेश बालदी, विधानपरिषद सदस्य विक्रांत पाटील, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, अपर पोलीस आयुक्त दीपक साकोरे, संजय येनपुरे, पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे, प्रशांत मोहिते, रश्मी नांदेडकर, संजयकुमार पाटील, महाविद्यालयीन विद्यार्थी, नशामुक्तीचे काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था आदी उपस्थित होते.